सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/९(NGO)/वि.से.प/२३१/२०२१./ 1505 मुंबई, दि. 27 /१२/२०२४

**विषय: विशेष सेवा पदक प्रदान करण्याबाबत. . .**

०००

१. गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्हयांमध्ये दि. ३१/१२/२०२४ पर्यंत २ वर्षे खंडित / अखंडित सेवा केलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे विहीत केलेल्या विवरणपत्रामध्ये विशेष सेवा पदकाचे प्रस्ताव दि.२७/०१/२०२५ पर्यंत मागविण्यात येत आहेत. सोबत आवश्यक शासन निर्णयाच्या प्रती संलग्न करण्यात येत आहेत.

२. गडचिरोली व गोंदीया जिल्ह्यांमध्ये नेमण्यात येणाऱ्या जिल्हयातील, बिनतारी संदेश विभाग, गुप्तवार्ता विभागातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तीन वर्षामध्ये खंडीत कालावधी एकत्रित धरून २ वर्षाचा कालावधी पुर्ण करणाऱ्या आणि राज्य राखीव पोलीस बलातील जे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी नक्षलग्रस्त जिल्हयामध्ये तीन वर्षात खंडीत सेवा धरून एक वर्षाचा सेवाकाळ पूर्ण केलेला आहे त्यांचे विशेष सेवा पदकसाठी प्रस्ताव सादर करावेत.

३. सदरचे पदक सेवाकालावधीमध्ये एकदाच देण्यात येत असल्याने ज्यांना यापूर्वी सदरचे पदक मिळालेले आहे, त्यांचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नये.

४. सर्व घटक प्रमुख यांनी विशेष सेवा पदकाच्या अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे प्रस्ताव पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र यांचेकडे दि.२०/०१/२०२५ पर्यंत विहीत नमुन्यात सादर करावेत.

५. पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र यांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करून जे पोलीस अधिकारी / अंमलदार विशेष सेवा पदकासाठी विहीत केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील त्यांचेच प्रस्ताव या कार्यालयास योग्य शिफारशीसह या पत्रासोबत संलग्न करण्यात आलेल्या विवरणपत्रात दि.२७/०१/२०२५ पर्यंत सादर करावेत.

27/12/2024

(डॉ.सुखविंदर सिंह)
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई (सस्नेह).
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन / लोहमार्ग / वाहतूक / रा.रा.पो.बल / दहशतवाद विरोधी पथक/ आर्थिक गुन्हे / प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे
संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग व मोटार परिवहन, म. रा., पुणे

सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक परिक्षेत्रिय / महिला अत्याचार प्रतिबंधक वि
म.राज्य मुंबई/ नागरी हक्क संरक्षण, म.राज्य, मुंबई / मोटार परिवहन पुणे
रा.रा.पो.बल पुणे / नागपूर / नक्षल विरोधी अभियान, नागपूर/ सायबर सेल, मुंबई

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, वडाची वाडी, पुणे

सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / रेल्वे / बिनतारी संदेश )

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र / प्राचार्य, गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

प्राचार्ये, अपारंपारीक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर

प्रत,

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं कार्यालय, म. रा., मुंबई

२/- यांनी सदर परिपत्रक **२५/०१/२०२५** पर्यंत पोलीस विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

| अ.क्र. | नाव | | | | | | पदनाम | सध्याच्या नेमणूकी चे ठिकाण | नक्षलग्रस्त भागात कर्तव्य बजावलेले ठिकाण | नक्षलग्रस्त भागातील कालावधी | | एकूण कालावधी | सचोटी / वर्तन (चांगले/वाईट) तसेच न्यायालयीन प्रकरण विभागीय चौकशी, शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रलंबित आहे किंवा कसे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | English | | | मराठी | | | | | | | | | |
| | Surname | First Name | Middle Name | आडनाव | पहिले नाव | मधले नाव | | | | पासून | पर्यंत | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 1 | 11 | 12 | 13 | 14 |
| | | | | | | | | | | | | | |

महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी/
कर्मचारी यांना प्रशंसनीय सेवेबद्दल यापुढे
बोधचिन्हे व प्रशस्तीपत्रे प्रदान
करण्याबाबत तसेच नक्षलग्रस्त भागात
काम करणाऱ्या पोलीस अधिकारी/
कर्मचारी यांना विशेष सेवापदक
प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक-पोएमडी १९९०/२२४४/प्र-क्र. ९१/पोल - १
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- २२ जुलै १९९२.

वाचा- १] महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अर्धशासकीय पत्र-क्र. १५/२७३५, दिनांक - २८ जून १९९०.

२] महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. विशा क्र. १५/२०३७, दि. ८ फेब्रुवारी ९१.

<u>शासन निर्णय</u>:- महाराष्ट्रातील पोलीस दलामध्ये निरनिराळ्या दर्जाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची संख्या १.२५ लाख आहे. प्रतिवर्षी प्रजासत्ताक दिनी व स्वातंत्र्यदिनी राज्य शासनाने शिफारस केलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांपैकी केंद्र शासनाने निवड केलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदके व गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदके देण्यात येतात. साधारणपणे प्रजासत्ताक दिनी व स्वातंत्र्य दिनी प्रत्येकी २ राष्ट्रपती पोलीस पदके व २० पोलीस पदके महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रदान करण्यात येतात. पोलीस दलाची एकूण संख्या लक्षात घेता, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी बहुतांश पोलीस अधिकारी/कर्मचारी अशा गौरवास वंचित रहातात. या परिस्थितीत (1) उत्कृष्ट कामगिरी दर्शविणाऱ्या तथापि, (2) राष्ट्रपती पोलीस पदके व पोलीस पदके मिळण्यापासून वंचित राहिलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या उत्कृष्ट सेवेची दखल घेण्यासाठी व (3) उत्तम कामगिरी बद्दल प्रतिवर्षी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना, तसेच गडचिरोली व चंद्रपूर व राज्यातील ज्या अन्य जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या हिंसक व [illegible] कारवायांना परिणामकारकरित्या आळा घालण्यासाठी शासनाकडून जी [illegible] योजना लागू करण्यात आली त्या जिल्ह्यामध्ये नेमण्यात आलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या [illegible] सेवेबद्दल "विशेष सेवा पदक" देण्या [illegible] [illegible] शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने सर्व बाबींचा

तखील विचार करून खालील प्रमाणे निर्णय घेतले आहेत.

२. [अ] ज्या पोलीस अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना लागोपाठ तीन वेळा शासनाने शिफारस केल्यानंतरही राष्ट्रपती पोलीस पदक / पोलीस पदक प्रदान करण्यात आलेले नसेल अशा पोलीस अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालकांकडून निर्धारित बोधचिन्हे व प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात यावीत असा निर्णय शासनाने घेतला आहे. सदरहू निर्णय १९९८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने राज्य शासनाने सदर पदकांसाठी शिफारस केलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत लागू करण्यात यावा.

[ब] तसेच खालील बाबतीत उत्तम कामगिरीबद्दल प्रतिवर्षी जास्तीत जास्त ५० पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना पोलीस महासंचालकांकडून निर्धारित बोधचिन्हे व प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यात यावीत.

१. बंडखोर दरोडेखोर गुन्हेगारांच्या टोळ्या किंवा अघोर व तंत्रबध्द गु[illegible] करणाऱ्या गुन्हेगारांच्या विरुध्द केलेली कारवाई.
२. सर्व प्रकारच्या सनसनाटी व कठीण गुन्ह्यांचा यशस्वीपणे शोध लावून तपास करणे.
३. नैसर्गिक आपत्तींच्यावेळी मदत कार्य करणे.
४. जनतेच्या [illegible] सोडवून पोलीसांची प्रतिमा उजळ करणे.
५. राष्ट्रीय स्तरावरील खेळात प्राविण्य दाखविणे.
६. पोलीसांच्या कामात सुधारणा घडविण्याकरिता कार्यवाहीत आणता येतील अशा सूचना करणे.
७. ३५ वर्षाच्या सेवेचे रेकॉर्ड उत्तम राखल्याबद्दल.
८. पोलीस मोटार परिवहन विभागातील चालक वगैरे अपघात न करता ३० वर्षाचे रेकॉर्ड उत्तम ठेवल्याबद्दल.
९. विशेष शाखेत [ प्रशिक्षण तसेच व्यस्त ] ५ वर्षे उत्तम कामगिरी केल्याबद्दल.
१०. प्रशंसनीय स्वरुपाचे अन्य तत्सम व अत्युत्तम काम केल्याबद्दल.

[क] गडचिरोली व चंद्रपूर तसेच राज्यातील ज्या अन्य जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या हिंसक व अनैतिक कारवायांना परिणामकारकरित्या आळा घालण्याकरिता शासनाकडून जी कृती योजना अंमलात आणण्यात आली आहे त्या जिल्ह्यामध्ये तैनात असणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना [illegible] विभागातील नक्षलवाद्यांच्या हालचाली टिपणारे गुन्हा अन्वेषण विभाग (गुप्तवार्ता) मधील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना तेथे दोन वर्षे पर्याप्त [illegible] सेवा केल्यानंतर

...वर्षाच्या कालावधीतील छडीत कालावधी एकत्रित करून होणारा कालावधी ...] व वरील विभागात बंदोबस्ताकरिता नेमण्यात आलेले राज्य राखीव पोलीस बलातील जे अधिकारी / कर्मचारी तीन वर्षामध्ये एक वर्षाचा सेवाकाळ पूर्ण करतील त्यांना " विशेष सेवा पदक " प्रदान करण्यात यावे.

३. वरील आदेश [illegible] निर्णय हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

४. यासाठी होणारा खर्च रु. ११,०००/- [रुपये एकावन्न हजार फक्त] "२०५५-पोलीस-००१-संचालन व प्रशासन पोलीस निरीक्षणालय" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन १९९२-९३ या आर्थिक वर्षासाठी नवीन बाब भाग-२ द्वारा मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-सीआर-१२६/९२/व्यय-७, दि. १.२.१९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[ रा. ना. चिन्मुलगुंद ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

प्रति,
महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, ( ५ प्रती )
महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा], महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
संचालक [लेखा शाखा] लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
वित्त विभाग, व्यय-७,
गृह विभाग, पोमुडी-२/३८ आ. १ब
लेखा अधिकारी, भा. पो. से. सेल, गृह विभाग.
निवडनस्ती.

महाराष्ट्र पोलीस अधिकारी /कर्मचारी यांना प्रशंसनीय सेवेबद्दल धातूची बोधचिन्हे, प्रशस्तीपत्रे प्रदान करण्याबाबत तसेच नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना विशेष सेवापदक प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक: पीएमडी-१२१२/प्र.क्र.१६६/पोल-१
गृह विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: २९ एप्रिल, २०१६

वाचा :-१) शासन निर्णय, गृह विभाग क्र. पीएमडी-१२९०/२२४४/प्र.क्र.९१/पोल-१, दि. २२.०७.१९९२, दि. १०.११.१९९३ व दि.१६.०१.२००२.
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पीएमडी-१२०७/प्र.क्र.८७/पोल-१, दि.१०.०७.२००७.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमंस/विशा-१०/९७२७/५१/२००९, दि.३१.०७.२०१२, दि.०४.१०.२०१२, दि.१९.१०.२०१५.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र पोलीस अधिकारी /कर्मचारी यांना प्रशंसनीय सेवेबद्दल धातूची बोधचिन्हे, प्रशस्तीपत्रे प्रदान करण्यास तसेच नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना विशेष सेवापदक प्रदान करण्याकरीता उपरोक्त क्र.१ येथील दि.२२.०७.१९९२ च्या शासन निर्णयान्वये विशिष्ट कार्यकाळ/ कर्तव्य पूर्ण करणाऱ्या ५० पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालकांकडून बोधचिन्हे व प्रशस्तीपत्रक देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तद्नंतर, शासन निर्णय दि.१०.११.१९९३ अन्वये बोधचिन्हांची संख्या १०० एवढी करण्यात आली होती. त्यामध्ये शासन निर्णय दि.१६.०१.२००२ अन्वये सुधारणा करण्यात येऊन राष्ट्रपती पोलीस पदक/पोलीस पदक धारकांनाही पोलीस महासंचालकांचे बोधचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तद्नंतर पोलीस महासंचालकांच्या बोधचिन्हांची संख्या शासन निर्णय दि. १०.०७.२००७ अन्वये २५० एवढी निश्चित करण्यात आली होती.

मागील काही वर्षात पोलीस दलाच्या संख्येत झालेली वाढ विचारात घेता, पोलीस महासंचालकांच्या बोधचिन्हांमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचप्रमाणे उपरोक्त क्र.१ व २ येथील शासन निर्णयान्वये वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना, अटी व शर्तीमध्ये आवश्यक तेथे सुधारणा करुन त्या एकत्रित स्वरुपात उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या

विचाराधीन होती. आता उपरोक्त क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित केलेले आदेश या आदेशान्वये अधिक्रमित करण्यात येत असून या संदर्भात खालील प्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांची संख्या २.४० लाख एवढी आहे. प्रतिवर्षी त्यामध्ये काही प्रमाणात वाढ होत आहे. ही बाब विचारात घेता, पोलीस महासंचालकांच्या बोधचिन्हांची संख्या ५०० एवढी निश्चित करण्यात येत आहे. सदर निर्णय हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

२. या शासन निर्णयान्वये निर्धारित केलेली पोलीस महासंचालकांची ५०० बोधचिन्हे खालील बाबतीत उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना प्राधान्याने देण्यात यावीत.

१) ज्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागोपाठ तीन वेळा राज्य शासनाने शिफारस केल्यानंतरही राष्ट्रपती पोलीस पदक/ पोलीस पदक प्रदान करण्यात आलेले नसेल, अशा पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालकांचे बोधचिन्ह व प्रशस्तीपत्रक प्रदान करण्यात यावे. ज्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालकाचे बोधचिन्ह व प्रशस्तीपत्र मिळण्यापूर्वी राष्ट्रपती पोलीस पदक /पोलीस पदक मिळेल त्यांनाही पोलीस महासंचालकाचे बोधचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात यावे.

२) दरोडेखोर गुन्हेगारांच्या टोळया किंवा अघोर व तंत्रबध्द गुन्हे करणाऱ्या गुन्हेगाराच्या विरुध्द करावयाची कारवाई.

३) सर्व प्रकारच्या सनसनाटी व कठीण गुन्हयांचा यशस्वीपणे शोध लावून तपास करणे.

४) नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत कार्य करणे.

५) जनतेच्या समस्या सोडवून पोलीसांची प्रतिमा उजळ करणे.

६) राष्ट्रीय स्तरावरील खेळांत प्राविण्य दाखविणे.

७) पोलीसांच्या कामात सुधारणा घडविण्याकरीता कार्यवाहीत आणता येतील अशा सूचना करणे.

८) २५ वर्षाच्या सेवेचा अभिलेख उत्तम राखल्याबद्दल.

९) पोलीस मोटार परिवहन विभागातील चालक वर्गाने अपघात न करता २० वर्षांचा सेवाभिलेख उत्तम ठेवल्याबद्दल.

१०) विशेष शाखेत (प्रशिक्षण संस्था धरुन) ५ वर्षे उत्तम कामगिरी केल्याबद्दल.

११) प्रशंसनीय स्वरुपाचे अन्य धैर्य व अत्युत्तम काम केल्याबद्दल.

१२) गडचिरोली व चंद्रपूर तसेच राज्यातील ज्या जिल्हयात नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायांना परिणामकारकरीत्या आळा घालण्यासाठी शासनाकडून लागू



Scanned with CamScanner

करण्यात आलेल्या कृति योजनेच्या जिल्हयामध्ये नेमण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना तसेच, वरील विभागात नक्षलवाद्यांच्या हालचाली टिपणारे गुन्हा अन्वेषण विभाग (गुप्तवार्ता) मधील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना तेथे दोन वर्ष पूर्णपणे खडतर सेवा केल्यानंतर (तीन वर्षाच्या कालावधीत खंडीत कालावधी एकत्रित करुन होणारा कालावधी धरुन) व वरील विभागात बंदोबस्ताकरीता नेमण्यात आलेले राज्य राखीव पोलीस बलातील जे अधिकारी /कर्मचारी तीन वर्षामध्ये एक वर्षाचा सेवाकाळ पूर्ण करतील त्यांना "विशेष सेवा पदक" प्रदान करण्यात यावे.

१३) या ५०० बोधचिन्हांपैकी २० टक्के म्हणजे १०० बोधचिन्हे चकमकीमध्ये जखमी झालेल्या, अतिरेक्याविरुध्द व नक्षलवाद्यांविरुध्द केलेल्या कारवाईमध्ये सामील झालेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी राखीव ठेवण्यात येतील.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. बी-१, "२०५५ पोलीस-१०९-जिल्हा पोलीस (००)(०१)-जिल्हा पोलीस दल- २१ - पुरवठा व सामग्री ( २०५५ ०१६८)" या लेखा शिर्षाखाली त्या-त्या वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४७३/१२/व्यय-७, दिनांक १२.११.२०१२ नुसार प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या बेवासाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१६०४१८१९१९४२७८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: CN = Charushila Chandrakant Tambekar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Joint Secretary
Date: 2016.04.29 16:30:30 +05'30'

( चारुशीला तांबेकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.



Scanned with CamScanner

UCSI. 224

BY IB FAX NO. 3868

DGP. MS.

I.W.No. 2591 Dt 22/6/2021

ADG

IG

Room No. 193-A/2,

North Block, New Delhi

Dated 19 June, 2021

1869 23/06/2021

F.No.II-18015/68/2014-LWE-III
Ministry of Home Affairs
Left Wing Extremism Division
***

1. Home Secretaries,
Government of Andhra Pradesh, Bihar, Chhattisgarh, Jharkhand, Kerala, Madhya Pradesh, Maharashtra, Odisha, Uttar Pradesh, Telangana, West Bengal.

2. Directors General of Police,
Government of Andhra Pradesh, Bihar, Chhattisgarh, Jharkhand, Kerala, Madhya Pradesh, Maharashtra, Odisha, Uttar Pradesh, Telangana, West Bengal.

**Subject: Review of Categorization of Districts affected by Left Wing Extremism**

As you are aware, the 'National Policy & Action Plan' is being implemented to combat Left Wing Extremism (LWE). The Central and the State Governments have been working closely to tackle this problem. A number of interventions are being made, both security and development related, as a result of which, there has been a marked improvement in the LWE scenario.

2. The categorization of districts provides the basis for deployment of resources under various schemes. The evolving LWE situation necessitates a periodic review of the districts in order to ensure that the focus of anti-LWE efforts remains aligned to the ground realities.

3. The districts covered under the Security Related Expenditure (SRE) Scheme and the 'Most Affected Districts were last revised in 2018. A comprehensive review has again been undertaken in consultation with the States. During the review, 23 existing SRE Scheme districts have been excluded and 02 new districts have been added. Additionally, 01 district, since it was carved out of the existing SRE district, has been included. As a result of these changes, the number of SRE districts has come down from 90 in 11 States to 70 in 10 states.

4. Meanwhile, based on the criteria of Maoist violent incidents a separate category of Most Affected Districts was created in 2015 with 35 districts to ensure focused deployment of resources. Subsequently, following a review in 2018, the number of districts was brought down to 30. A fresh review of these districts was undertaken, in which 9 districts were dropped and 4 districts were added, to

Scanned with CamScanner

determine the 25 Most Affected Districts. These districts account for 85% of all the Maoist violence in the country.

5. Separately, a new category of the 'Districts of Concern' has been added to counter Maoists' spread to new areas and to stop resurgence in the areas where LWE influence is waning. This would address resource gap and consolidate gains in these areas.

6. The list of districts covered under SRE Scheme, those categorized as 'Most Affected LWE Districts' and as 'Districts of Concern' are given below:

(a) <u>SRE Scheme Districts</u>: A total of 70 districts in 10 States will now becovered by the SRE Scheme w.e.f. 01 July, 2021. List is as under:

| Sl. No. | State | No. of District | Districts covered Under SRE Scheme |
|---|---|---|---|
| 1. | Andhra Pradesh | 05 | East Godavari, Srikakulam, Visakhapatnam, Vizianagram, West Godavari. |
| 2. | Bihar | 10 | Aurangabad, Banka, Gaya, Jamui, Kaimur, Lakhisarai, Munger, Nawada, Rohtas, West Champaran. |
| 3. | Chhattisgarh | 14 | Balrampur, Bastar, Bijapur, Dantewada, Dhamtari, Gariyaband, Kanker, Kondagaon, Mahasamund, Narayanpur, Rajnandgaon, Sukma, Kabirdham, Mungeli. |
| 4. | Jharkhand | 16 | Bokaro, Chatra, Dhanbad, Dumka, East Singhbhum, Garhwa, Giridih, Gumla, Hazaribagh, Khunti, Latehar, Lohardaga, Palamu, Ranchi, Saraikela-Kharaswan, West Singhbhum. |
| 5. | Kerala | 03 | Malappuram, Palakkad, Wayanad. |
| 6. | Madhya Pradesh | 03 | Balaghat, Mandla, Dindori. |
| 7. | Maharashtra | 02 | Gadchiroli, Gondia. |
| 8. | Odisha | 10 | Bargarh, Bolangir, Kalahandi, Kandhamal, Koraput, Malkangiri, Nabrangpur, Nuapada, Rayagada, Sundergarh. |
| 9. | Telangana | 06 | Adilabad, Bhadradri-Kothagudem, Jayashankar-Bhupalpally, Komaram-Bheem, Mancherial, Mulugu. |
| 10. | West Bengal | 01 | Jhargram. |
| | Total | 70 | |

(b) <u>Most Affected Districts</u>: 25 districts in 08 States will now be classifiedas

Scanned with CamScanner

Most Affected LWE Districts. List is as under:

| Sl. No. | State | No of Districts | Most Affected LWE Districts |
|---|---|---|---|
| 1. | Andhra Pradesh | 01 | Vishakhapatnam |
| 2. | Bihar | 03 | Gaya, Jamui, Lakhisarai |
| 3. | Chhattisgarh | 07 | Bastar, Bijapur, Dantewada, Kanker, Narayanpur, Rajnandgaon, Sukma |
| 4. | Jharkhand | 08 | Chatra, Giridh, Gumla, Khunti, Latehar, LohardagaSaraikela-Kharaswan, West Singhbhum |
| 5. | Madhya Pradesh | 01 | Balaghat |
| 6. | Maharashtra | 01 | Gadchiroli |
| 7. | Odisha | 03 | Kandhamal, Malkangiri, Kalahandi |
| 8. | Telangana | 01 | Bhadradri-Kothagudem |
| | Total | 25 | |

1/25

(c) District of Concern: 08 districts in 06 States will now be classified as 'District of Concern'. List is as under:

| Sl. No. | State | No. of District | Districts of Concern |
|---|---|---|---|
| 1. | Bihar | 1 | Aurangabad |
| 2. | Chhattisgarh | 3 | Kabirdham, Kondagaon, Mungeli |
| 3. | Jharkhand | 1 | Garhwa |
| 4. | Kerala | 1 | Wayanad |
| 5. | Madhya Pradesh | 1 | Mandla |
| 6. | Odisha | 1 | Koraput |
| | Total | 8 | |

8. The total resource envelope will now be utilized in a more focused manner on the districts as per the revised categorization.

9. This issues with the approval of the competent authority.

(Praveen Vashista)
Additional Secretary (LWE)
Tele No 011-23092456

Copy to:
1. Secretary, Department of Expenditure, Ministry of Finance, North Block.
2. CEO, Niti Aayog, Sansad Marg.
3. Director General, CRPF / BSF / ITBP /SSB.

Scanned with CamScanner

रजिस्ट्री सं० डी० एल०-33004/99 REGD. NO. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

असाधारण
EXTRAORDINARY
भाग I—खण्ड 1
PART I—Section 1
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 87] नई दिल्ली, बृहस्पतिवार, मार्च 14, 2019/फाल्गुन 23, 1940
No. 87] NEW DELHI, THURSDAY, MARCH 14, 2019/ PHALGUNA 23, 1940

## गृह मंत्रालय

### अधिसूचना

नई दिल्ली, 13 मार्च, 2019

फा.सं. 23011/03/2018-पीएमए.—जम्मू और कश्मीर राज्य/पूर्वोत्तर क्षेत्र/वामपंथी अतिवाद से प्रभावित क्षेत्र के लिए "पुलिस आंतरिक सुरक्षा सेवा पदक" के संबंध में इस मंत्रालय की दिनांक 23 जुलाई, 2018 की अधिसूचना सं. 23011/3/2018-पीएमए के क्रम में इस पुरस्कार हेतु पात्र क्षेत्र एतद्द्वारा निम्नवत अधिसूचित किए जाते हैं:-

| क्र. सं. | राज्य | वामपंथी अतिवाद से प्रभावित क्षेत्र |
|---|---|---|
| 1. | जम्मू एवं कश्मीर | संपूर्ण राज्य |
| 2. | पूर्वोत्तर क्षेत्र | अरुणाचल प्रदेश, असम, मणिपुर, मेघालय, मिजोरम, नागालैंड, सिक्किम और त्रिपुरा। |
| 3. | वामपंथी अतिवाद से प्रभावित क्षेत्र | |
| (i) | आंध्र प्रदेश | पूर्वी गोदावरी, गुंटूर, श्रीकाकुलम, विशाखापत्तनम, विजियानगरम, पश्चिमी गोदावरी। |
| (ii) | बिहार | अरवाल, औरंगाबाद, बांका, पूर्वी चंपारण, गया, जमुई, जहानाबाद, कैमूर, लखीसराय, मुंगेर, मुजफ्फरपुर, नालंदा, नवादा, रोहतास, वैशाली, पश्चिमी चंपारण। |
| (iii) | छत्तीसगढ़ | बालोद, बलरामपुर, बस्तर, बीजापुर, दंतेवाड़ा, धमतारी, गरियाबंद, कांकेर, कोंडागांव, महासमुंद, नारायणपुर, राजनंदगांव, सुकमा, कबीरधाम। |
| (iv) | झारखंड | बोकारो, चतरा, धनबाद, दुमका, पूर्वी सिंहभूम, गढ़वा, गिरिडीह, गुमला, हजारीबाग, खूंटी, कोडरमा, लातेहार, लोहरदगा, पलामू, रामगढ़, रांची, सिमडेगा, सरायकेला-खरसवां, पश्चिमी सिंहभूम। |
| (v) | मध्य प्रदेश | बालाघाट और मंडला। |

| | | |
|---|---|---|
| (vi) | महाराष्ट्र | चंद्रपुर, गढ़चिरोली, गोंदिया। |
| (vii) | उड़ीसा | अंगुल, बारगढ़, बोलंगिर, बौध, देवगढ़, कालाहांडी, कंधमाल, कोरापुट, मलकानगिरी, नबरंगपुर, नयागढ़, नुआपाड़ा, रायगड़ा, संबलपुर, सुंदरगढ़। |
| (viii) | तेलंगाना | आदिलाबाद, भद्राद्री-कोठागुडेम, जयशंकर-भुपालपल्ली, खम्मम, कोमारम-भीम, मंचेरियल, पेड्डापल्ली, वारंगल ग्रामीण। |
| (ix) | उत्तर प्रदेश | चंदौली, मिर्जापुर, सोनभद्र। |
| (x) | पश्चिम बंगाल | झारग्राम। |
| (xi) | केरल | मलप्पुरम, पलक्कड़ एवं वायानाड। |

अमिताभ खर्कवाल, संयुक्त सचिव

## MINISTRY OF HOME AFFAIRS

### NOTIFICATION

New Delhi, the 13th March, 2019

**F.No.23011/03/2018-PMA.**—In continuation of this Ministry's Notification No. 23011/3/2018-PMA dated 23rd July, 2018, related to Police Antrik Suraksha Seva Padak for J&K State/NE Region/LWE Region, the eligible areas for the award are hereby notified as under:-

| S/N | States | Districts affected by LWE |
|---|---|---|
| 1 | Jammu & Kashmir | Whole State |
| 2 | NE Region | Arunachal Pradesh, Assam, Manipur, Meghalaya, Mizoram, Nagaland, Sikkim, and Tripura. |
| 3. | LWE areas | |
| (i) | Andhra Pradesh | East Godavari, Guntur, Srikakulam, Visakhapatnam, Vizianagaram, West Godavari. |
| (ii) | Bihar | Arwal, Aurangabad, Banka, East Champaran, Gaya, Jamui, Jehanabad, Kaimur, Lakhisarai, Munger, Muzaffarpur, Nalanda, Nawada, Rohtas, Vaishali, West Champaran. |
| (iii) | Chhattisgarh | Balod, Balrampur, Bastar, Bijapur, Dantewada, Dhamtari, Gariayaband, Kanker, Kondagon, Mahasamund, Narayanpur, Rajnandgaon, Sukma, Kabirdham. |
| (iv) | Jharkhand | Bokaro, Chatra, Dhanbad, Dumka, East Singhbhum, Garhwa, Giridih, Gumla, Hazaribagh, Khunti, Koderma, Latehar, Lohardagga, Palamu, Ramgarh, Ranchi, Simdega, Saraikela-Kharaswan, West Singhbhum. |
| (v) | Madhya Pradesh | Balaghat and Mandla. |
| (vi) | Maharashtra | Chandrapur, Gadchiroli, Gondia. |
| (vii) | Orissa | Angul, Bargarh, Bolangir, Boudh, Deogarh, Kalahandi, Kandhamal, Koraput, Malkangiri, Navrangpur, Nayagarh, Nuapada, Rayagada, Sambalpur, Sundargarh. |
| (viii) | Telangana | Adilabad, Bhadradri-Kothagudem, Jayashankar-Bhupalpally, Khammam, Komaram-Bheem, Mancherial, Peddapalle, Warngal Rural. |
| (ix) | Uttar Pradesh | Chandauli, Mirzapur, Sonebhardra. |
| (x) | West Bengal | Jhargram. |
| (xi) | Kerala | Malappuram, Palakkad & Wayanad. |

AMITABH KHARKWAL, Jt. Secy.

Uploaded by Dte. of Printing at Government of India Press, Ring Road, Mayapuri, New Delhi-110064
and Published by the Controller of Publications, Delhi-110054.

MANOJ KUMAR VERMA

Digitally signed by MANOJ KUMAR VERMA
Date: 2019.03.14 17:18:38 +05'30'